DAY — 20 SEAT NUMBER

| 2023 | III | 18 | 1500 | J-376 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# HISTORY (38)

Time : 3 Hrs. (8 Pages) Max. Marks : 80

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
(२) उजव्या बाजूस गुण दर्शविलेले आहेत.
(३) उत्तरपत्रिकेमध्ये आकृत्या पेनानेच काढाव्यात.
(४) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानांवर लिहावे.

प्र. १. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा : (६) [१०]

(१) इ.स. १४४० मध्ये ------- याने छापखाना सुरू केला.
(अ) होमर (ब) जेम्स वॅट
(क) गुटेनबर्ग (ड) ॲरिस्टॉटल

(२) वास्को-द-गामा हा ------- या देशाचा दर्यावर्दी होता.
(अ) पोर्तुगाल (ब) इंग्लंड
(क) फ्रांस (ड) पोलंड

(३) मराठ्यांनी पोर्तुगिजांना ------- च्या वेढ्यात पराभूत केले.
(अ) वेंगुर्ला (ब) फोंडा
(क) सुरत (ड) राजापूर

(४) ग. ज. लॉर्ड विल्यम बेंटीक यांनी ------- यांच्या प्रयत्नामुळे सतीप्रथा निर्मूलनाचा कायदा पास केला.
(अ) डॉ. भांडारकर (ब) महात्मा फुले
(क) स्वामी दयानंद सरस्वती (ड) राजा राममोहन रॉय

(५) दुसऱ्या महायुद्धात अमेरिकाने पहिला अणुबॉम्ब ------- या शहरावर टाकला.

(अ) हिरोशिमा (ब) नागासाकी

(क) पर्लहार्बर (ड) स्टॅलिनग्राड

(६) सार्क संघटनेचे मुख्यालय ------ येथे आहे.

(अ) थायलंड (ब) जकार्ता

(क) काठमांडू (ड) दिल्ली

**(ब)** पुढील प्रत्येक संचातील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा : (४)

(१)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | फर्डिनंड मॅगेलन | — | भारतात आलेला पहिला दर्यावर्दी |
| (ii) | सॅम्युएल डी शॅम्प्लेन | — | उत्तर अमेरिकेत फ्रेंच वसाहती स्थापन करणारा |
| (iii) | कॅप्टन जेम्स कुक | — | न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया जिंकणारा इंग्लंडचा सेनानी |
| (iv) | द बोगनविले | — | पॅसिफिक महासागर पार करून 'ताहिती' येथे पोहोचलेला दर्यावर्दी |

(२)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | वखार | — | मालाच्या साठवणुकीचे ठिकाण |
| (ii) | कार्ताझ | — | परवान्याचा दस्तऐवज |
| (iii) | फॅक्टर्स | — | वखारीत काम करणारे नोकर |
| (iv) | टाकसाळ | — | जिंकून घेतलेला प्रदेश |

(३)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | कास्मो-द-ग्वार्द | — | पोर्तुगीज इतिहासकार |
| (ii) | गोंसालू मार्तीस | — | पोर्तुगीज वकील |
| (iii) | फ्रांस्वाँ मार्टिन | — | डच वखारीचा प्रमुख |
| (iv) | हेन्री रेव्हिंग्टन | — | इंग्रज अधिकारी |

(४) 'अ' गट — 'ब' गट

(i) हैद्राबाद संस्थानचे विलीनीकरण — स्वामी रामानंद तीर्थ

(ii) काश्मीर संस्थानचा राजा — शेख अब्दुल्ला

(iii) गोवा मुक्ती लढ्यातील मोलाचे योगदान — मोहन रानडे

(iv) पुदुच्चेरी येथील कामगार नेते — व्ही सुबय्या

प्र. २. (अ) ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा : (४) [८]

(१) वराहमिहीर यांनी लिहिलेला ग्रंथ –

(२) भारतात सर्वप्रथम आलेले युरोपीय –

(३) पहिल्या महायुद्धातील जर्मनी, ऑस्ट्रीया, हंगेरी, तुर्कस्तान, बल्गेरिया या राष्ट्रांचा गट –

(४) दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएट रशिया किंवा अमेरिका यांच्या गटात सामिल न होण्याचे भारताचे धोरण –

(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा : (४)

(१) ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांनी अकराव्या शतकात वेळोवेळी धर्मयुद्धे केली, कारण –

(अ) त्यांना आपल्या धर्माचे वर्चस्व प्रस्थापित करायचे होते.

(ब) इस्लाम धर्मियांनी त्यांच्या विरुद्ध सतत आक्रमणे केली होती.

(क) ख्रिश्चन धर्मियांसाठी पवित्र असणारी जेरुसलेम व बेथेलहॅम ही शहरे इस्लामी सत्ताधीशांकडून परत मिळवायची होती.

(ड) व्हेनीस व जेनेवा ही शहरे इस्लामी सत्ताधीशांकडून त्यांना जिंकायची होती.

(२) गॅलिलिओला 'आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा जनक' म्हटले जाते, कारण –

(अ) त्याने प्रथमच मोठी दुर्बीण तयार केली होती.

(ब) त्याने आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा शोध लावला.

(क) त्याने निरीक्षण करणे व सिद्धांत तर्कशुद्ध पद्धत रूढ केली.

(ड) त्याने आधुनिक प्रायोगिक विज्ञानावर मोठा ग्रंथ लिहिला होता.

(३) काही संस्थाने वगळता बहूसंख्य संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली; कारण -

(अ) या संस्थानिकांना तनखा दिला जाणार होता.

(ब) सरदार वल्लभभाई पटेल यांनी मुत्सुद्दीपणाने सर्वांना मान्य होईल असा सामीलनामा तयार केला होता.

(क) केंद्र सरकारने या संस्थानिकांना त्यांचे अधिकार अबाधित ठेवण्याचे आश्वासन दिले होते.

(ड) सरदार वल्लभभाई पटेलांनी संस्थानिकांना संस्थान विलीन झाल्यास मोठे बक्षीस देण्याचे आश्वासन दिले होते.

(४) ॲन्झुस करारात ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि अमेरिका वगळता कोणत्याही राष्ट्राला प्रवेश दिला नाही, कारण -


(अ) त्यांना ग्रेट ब्रिटन व फ्रांसचे महत्त्व वाढू दयायचे नव्हते.

(ब) हा लष्करी करार होता.

(क) हा गुप्त करार होता.

(ड) हा फक्त मित्रदेशांतील करार होता.

**प्र. ३.** (अ) पुढील नकाशाचे निरीक्षणकरून प्रश्नांची उत्तरे लिहा : (५) [१३]



सागरी सफरींचा मार्ग

(१) वास्को-द-गामा समुद्रमार्गे भारतात कोणत्या बंदरात उतरला?

(२) मादागास्कर हे बेट कोणत्या महासागरात आहे?


(३) फर्डिनंड मॅगेलन याने कोणकोणत्या महासागरातून प्रवास केला? कोणतेही एक नाव लिहा.

(४) मेक्सिको हा देश कोणत्या खंडात आहे?

(५) या नकाशाच्या मदतीने कोणती माहिती मिळते?

**(ब)** दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतीही चार) : (८)


(१)





(२) पुढील तक्ता पूर्ण करा :

| भारतातील शहरे | कोणत्या युरोपीय सत्तेचे स्थान (केंद्र) |
|---|---|
| गोवा | ............................................ |
| कोलकाता | ............................................ |
| नागापट्टन | ............................................ |
| पुदुच्चेरी | ............................................ |


(३)




(४)




(५)




(६)




प्र. ४. (अ) संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन) : (६) [१५]

(१) कर्नाटक युद्धे

(२) कामा गाटा मारू घटना

(३) शीतयुद्धाची पार्श्वभूमी

(४) अलिप्ततावादी चळवळीचे निकष

(५) वायू प्रदूषण

(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन) : (९)

(१) औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली.

(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्रे सुरू केली.

(३) इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला.

(४) दुसरे महायुद्ध संपताच निर्वसाहतीकरणास अधिकच वेग आला.

(५) भारताने इव्हीएम मशीनमध्ये VVPATची सोय केली.

**प्र. ५. खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन) : [९]**

(१) सर्व धर्मियांसाठी पोर्तुगिजांची वागणूक सहिष्णुतेची नव्हती.

(२) १८५७चे स्वातंत्र्य युद्ध हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मते, 'पहिले' स्वातंत्र्य युद्ध होते.

(३) 'जर्मन राष्ट्रवाद' व 'भारतीय राष्ट्रवाद' यात मूलत: फरक होता.

(४) भारताने वसाहतवाद विरोधात नेहमीच भूमिका मांडली आहे.

(५) 'रात्रशाळा' आणि 'साखरशाळा' यांची समाजाला गरज आहे.

**प्र. ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : [१०]**

(१) हैदराबाद मुक्तीसंग्रामाची सविस्तर माहिती लिहा.

(२) आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेची माहिती लिहा.

(३) माहितीचा अधिकार अधिनियमाची माहिती लिहा.

**प्र. ७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : [१५]**

(१) युरोपातील धर्मयुद्धांची माहिती लिहा.

(अ) अपयशाची कारणे

(ब) धर्मयुद्धांचे परिणाम

(२) इंग्रज-मराठे यांच्यात झालेल्या युद्धांची माहिती लिहा.

(अ) पहिले इंग्रज-मराठा युद्ध

(ब) दुसरे इंग्रज-मराठा युद्ध

(क) तिसरे इंग्रज-मराठा युद्ध

(३) खालील समाज सुधारकांचे कार्य लिहा.

(अ) महात्मा ज्योतीराव फुले

(ब) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

(क) सर सय्यद अहमद खान

(४) 'चले जाव' आंदोलनाची माहिती लिहा.

(अ) काँग्रेस मुंबई अधिवेशन

(ब) गांधीजींचे आवाहन

(क) चळवळ व परिणाम

(५) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांविषयी माहिती लिहा.

(अ) जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम

(ब) शालेय पोषण आहार

(क) सर्व शिक्षा अभियान

◆◆◆